# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/07/2023 (मंगळवार) सकाळ


---

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. खापरखेडा :— सरतर्फे फिर्यादी नामे— पोलीस निरीक्षक महेश दत्ताराव चाटे वय ५१ वर्ष यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अप. क्र. २४/२०१७ कलम ३०२, २०१ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

कोणीतरी अज्ञात आरोपीने अनोळखी इसमास कोणत्या तरी अज्ञात कारणावरून मृतकच्या डोक्यावर कोणत्यातरी धारदार शस्त्राने गंभीर दुखापत करून जिवानीशी ठार केले व प्रेत वलनी पोलीस चौकीच्या मागे पाण्याचे कॅनल मध्ये पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने फेकुन दिले. सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान निष्पन्न झाले की, मृतक नामे— जॉन उर्फ कमलेशसिंग स्वामीदिन टेकाम व आरोपीची पत्नी यांचे प्रेमसंबध असल्याचे संशयावरून आरोपीने मृतकास धारदार शस्त्राने जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक महेश चाटे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक ११/०७/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे ५ घुमरे सो. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भादवि. मध्ये आजीवन कारावास व ३०००/— रू. दंड, दंड न भरल्यास १ वर्ष साधी कैद कलम २०१ भादवि. मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व २०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी साखरे सो. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी कर्मचारी म्हणुन पोना/१९५४ सचीन चौधरी पो.स्टे. खापरखेडा यांनी मदत केली आहे.

### घरफोडी

पो.स्टे. केळवद :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा कवठा रोड केळवद येथे दिनांक ०८/०७/२०२३ चे ००.०० वा. ते दिनांक ०९/०७/२०२३ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— किशोर धर्मराज बाबोडे, वय ४० वर्ष, रा. कवठा रोड वार्ड नं. ४ केळवद याचे घरी कोणी हजर नसतांना मागील दार जोराने ढकलून दाराची कडी तोडुन कोणीतरी अज्ञात चोराने घरात प्रवेश करून किचन रूम मधील गोदरेजचे लोखंडी कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेले नगदी ६०,०००/— रू. चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार संदीप नागरे मो. नं. ९०११५९६५०० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर